| | | | |
|---|---|---|---|
| Publication | : Sakal (Marathi) | Date | : 02.10.2012 |
| Edition | : Gondia Today | Page No | : 01 |
| Subject | : Adani distribute educational material of 2500 students…….. | | |


# अडीच हजार विद्यार्थ्यांचा भार उचलला 'अदानी'ने

तिरोडा, ता. १ : येथील अदानी उद्योग समूहाच्या अदानी फाउंडेशनमार्फत तालुक्यातील ४६ अंगणवाडी, ३४ शाळा आणि २४०० विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्यांची भेट देऊन सामाजिक जबाबदारी पार पाडली.

कार्यक्रमाला माजी आमदार दिलिप बनसोड, नगराध्यक्ष राखी गुणेरिया,जफारबेग मिर्जा, भिवापूरचे सरपंच बबलदास रामटेके, मेंदीपूरच्या सरंपचा शांताबाई रहांगडाले व अदांणी फाउंडेशनचे सुबोधकुमार सिंग यांची उपस्थिती होती. परिसरातील सातशेंच्यावर पालकांनी या कार्यक्रमाला उपस्थिती दर्शविली. प्रास्ताविकात सुबोधकुमार सिंग यांनी फाउंडेशनची भूमिका विशद केली. अदानी समूहाचे काम सामाजिक क्षेत्रात मोलाचे असून प्रशंसनीय असल्याच्या प्रतिक्रिया उपस्थित मान्यवरांनी यावेळी दिल्या. प्रत्येक शाळेत जलशुद्धीकरण सयंत्राची उभारणी समूहाने करून दिल्यास पिण्याच्या पाण्याची सोय होईल, अशी अपेक्षा नगराध्यक्ष राखी गुणेरिया यांनी व्यक्त केली. अंगणवाडीसेविका व विद्यार्थ्यांना गणवेश व बॅगचे वाटप करण्यात आले. कार्यक्रमाचे संचालन नरेंद्र गौतम यांनी, तर आभार श्री वैद्य यांनी मानले.

This document was created with Win2PDF available at http://www.win2pdf.com.
The unregistered version of Win2PDF is for evaluation or non-commercial use only.
This page will not be added after purchasing Win2PDF.